**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर ४१६००४**

**अत्यंत महत्वाचे**

क्रमांक कोविमं/लेखा/नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण वर्गणी/ 848
दिनांक १७/८/२०२१

विषय: इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी सन २०२१-२२ साठी वार्षिक नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण वार्षिक वर्गणी बाबतचे परिपत्रक

संदर्भ: १)परिपत्रक क्रमांक कोविमं/लेखा/नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण वर्गणी/५७२ दिनांक १४ जुलै २०२१
२) परिपत्रक क्रमांक कोविमं/लेखा/नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण वर्गणी/७१२, दिनांक ०२/८/२०२१

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ट महाविद्यालये,
सातारा/सांगली/कोल्हापूर

कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ट महाविद्यालयाचे प्रमुखांना संदर्भीय परिपत्रकान्वये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ या वर्गासाठी नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण वार्षिक वर्गणी खालीलप्रमाणे आपल्या नजीकच्या बँक ऑफ इंडियाच्या शाखेत दिनांक १०/८/२०२१ पर्यंत नियमित शुल्काने चलनाने भरण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतु अद्याप काही माध्यमिक शाळा व कनिष्ट महाविद्यालयांनी सदर नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण वर्गणी मंडळाकडे जमा केली नसल्याचे निदर्शनास येत आहे. तरी अशा माध्यमिक शाळा व कनिष्ट महाविद्यालयांनी त्वरीत खालील तपशीलानुसार दंडासहित नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क त्वरीत जमा करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

| अ.क्र. | तपशील | नोंदणी शुल्क | शिक्षण संक्रमण वर्गणी |
|---|---|---|---|
| १) | **इयत्ता १० वी साठी ००१ ते १०० विद्यार्थी** | **रू.१०००/-** | **रू.५००/-** |
| | **१०१ ते पुढील प्रत्येक १०० विद्यार्थ्यामागे** | **रू.२००/-** | |
| २) | **इयत्ता १२ वी साठी ००१ ते १०० विद्यार्थी** | **रू.१०००/-** | **रू.५००/-** |
| | **१०१ ते पुढील प्रत्येक १०० विद्यार्थ्यामागे** | **रू.४००/-** | |
| | दिनांक ११/८/२०२१ ते ३१/८/२०२१ नोंदणी शुल्क दंड रू.२००/- | | |

तरी उपरोक्तप्रमाणे सदर नोंदणी शुल्काची व शिक्षण संक्रमण वर्गणी भरून जमा केलेल्या शुल्काची चलनाची प्रत आपल्या **माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाशी संबंधित मंडळाने नेमून दिलेल्या वितरण केंद्रावर दिनांक २० ऑगस्ट २०२१ रोजी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी ) सन २०२१ च्या निकालाची गुणपत्रके स्विकारतेवळी जमा करणे आवश्यक आहे.** तरी आपल्या माध्यमिक शाळा व कनिष्ट महाविद्यालयाचे नोंदणी शुल्क/शिक्षण संक्रमण शुल्क वर्गणी मंडळाच्या संदर्भीय परिपत्रकान्वये जमा करण्याबाबतची कार्यवाही त्वरीत करण्यात यावी.

(देविदास कुलाळ)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

**प्रत माहितीस्तव तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव:**
**मुख्याध्यापक, सर्व वितरण केंद्रे,**
**मुख्याध्यापक, सर्व वितरण केंद्र यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपणामार्फतही आपल्या वितरण केंद्राशी संबंधित शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांच्या निदर्शनास आणावे. नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण वार्षिक वर्गणी शुल्काची चलने वितरण केंद्रांनी जमा करून ठेवावीत.**